।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२१-२२/४१ दिनांक : ०४/०५/२०२१

### तातडीचे व महत्वाचे परीपत्रक

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ,
प्राचार्य तथा सर्व परीक्षा केंद्र प्रमुख, हिवाळी-२०२० परीक्षा, प्रस्तुत विद्यापीठ,
मा. संचालक, सर्व संकुले नांदेड परीसर, लातूर व परभणी उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ,
प्राचार्य, न्यु.मॉडेल, डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ,
समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय:हिवाळी-२०२०, पदवी, पद्व्युत्तर (व्यावसायिक/अव्यावसायिक) अभ्यासक्रमाच्या परीक्षेबाबत.
संदर्भ: १) दिनांक ३०/०४/२०२१ रोजी मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाची तातडीची ऑनलाईन बैठक.
२) परीक्षा/समनवय/२०२०-२१/३४, दिनांक २८/०४/२०२१ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, हिवाळी-२०२० मधील ज्या अभ्यासक्रम व विषयाच्या परीक्षा घेणे बाकी आहेत त्या कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे शासनाने केलेल्या निर्देशाप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

प्रस्तुत विद्यापीठाच्या उर्वरीत हिवाळी-२०२०, पदवी व पद्व्युत्तर (व्यावसायिक व अव्यावसायिक) अभ्यासक्रमाच्या क्लस्टरपध्दतीने महाविद्यालयस्तरावरुन व विद्यापीठ स्तराववरुन होणा-या परीक्षेचा कालावधी मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक ३०/०४/२०२१ रोजी आयोजीत केलेल्या तातडीच्या ऑनलाईन बैठकीत खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., एम.बी.ए., बी.फार्म, एम.फार्म, आभियांत्रिकी, बी.एफ.ए., बी.लिब., एम. लिब., बी.जे., एम.जे.इत्यादी. **(क्लस्टर पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षा)** | २२ ते ३० मे, २०२१ | प्रथम वर्ष महाविद्यालयस्तर |
| २. | बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., एम.बी.ए., एम.फार्म, बी.एफ.ए., बी.लिब., एम.लिब., बी.जे., एम.जे. इत्यादी. | १८ ते २१ मे, २०२१ | अंतीम वर्ष विद्यापीठ स्तर |
| ३. | सर्व एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. **(क्लस्टर पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षा)** | २२ ते ३० मे, २०२१ | प्रथम वर्ष महाविद्यालयस्तर |
| ४. | सर्व एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी, एम. बी.ए., डिप्लोमा टि.टि.पी. इत्यादी. | १८ ते २१ मे, २०२१ | अंतीम वर्ष विद्यापीठस्तर |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | सर्व विधी (बी.ए.एलएल.बी/बी.एस.एल/ प्री लॉ प्रथम वर्ष, एलएल.बी.प्रथम वर्ष, एलएल.एम.प्रथम वर्ष) **(क्लस्टर पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षा)** | २४ ते ३१ मे, २०२१ | प्रथम वर्ष महाविद्यालयस्तर |
| ६. | सर्व दूरशिक्षण अभ्यासक्रम, हिवाळी-२०२० | २४ ते २९ मे, २०२१ | प्रथम व व्दितीय वर्ष पद्व्युत्तर अभ्यासक्रम विद्यापीठस्तर |
| ७. | सर्व संकुले, विद्यापीठ परिसर न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, उपकेंद्र,लातूर, परभणी | २४ ते २९ मे, २०२१ | पद्व्युत्तर अभ्यासक्रम |

वरील प्रमाणे परीक्षा सुरळीतपणे पार पाडाव्यात. विद्यापीठ स्तरावरून होणा-या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थानी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणेसाठी संमती दिली आहे त्या सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणे अनिवार्य आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षेसंबधी लागणारी संपूर्ण अचूक माहिती परीक्षा विभागाकडे दिनांक ८/५/२०२१ पर्यंत पाठविणे बाबत संदर्भ क्र. २ च्या परीपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. क्लस्टर हेड महाविद्यालयांनी क्लस्टर पध्दतीने उर्वरीत हिवाळी-२०२० मधील सर्व परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घ्यावी, त्याकरीता सर्व क्लस्टर महाविद्यालयांनी आपआपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ऑनलाईन संबधीची अचूक माहिती क्लस्टर हेड महाविद्यालयांना देवून सदर परीक्षा संपर्णूपणे ऑनलाईन पध्दतीने घ्यावी. तसेच सर्व संकुले, विद्यापीठ परीसर, उपकेंद्र-लातूर/परभणी, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली यांना कळविण्यात येते की, आपल्या संकुलातील उर्वरीत सर्व हिवाळी-२०२०, परीक्षा हया संपूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही करून सर्व परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घ्याव्यात.

महाविद्यालयस्तरावरील क्लस्टर परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका काढणे व इतर बाबीसाठी काही अडचणी येत असतील तर त्यांनी संबधीत विद्याशाखेच्या अधिष्ठातामार्फत इतर क्लस्टर हेड/क्लस्टर महाविद्यालयाची मदत घेवून कार्यवाही पुर्ण करावी.

सबब, हिवाळी-२०२०, परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अचूक माहिती तातडीने पाठविण्यात यावी, जेणे करून कोणताही विद्यार्थी या परीक्षेपासून वंचीत राहणार नाही याची योग्य ती खबरदारी घ्यावी.

**प्राचार्य, डॉ.वसंत भोसले**
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
१. मा.कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा.प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव :**
**अधिक्षक/सहा.अधिक्षक, कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ**-या परीपत्रकान्वये वेळापत्रक तयार करून विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे